भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक- ६/७/२०१९

# प्रेसनोट

# घरफोडी करणारा अटकेत

# भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दिनांक २८/६/२०१९ रोजी भारती विदयापीठ पोलीस ठाणेचे तपास पथकाचे अधिकारी महेंद्र पाटील व त्यांची टिम पोलीस ठाणे हददीत पेट्रोंलीग करीत असणारे तपास पथकाचे कर्मचारी हे पेट्रोंलीग करित असताना तपास पथकातील **समीर बागसिराज व जगदीश खेडकर** यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मुंबई बॅगलोर हायवेचे भुमकर चौकाकडुन आंबेगाव बु।। कडे जाणारे सर्व्हिस रोडवर एक पांढरे रंगाची स्विफट थांबलेली असुन त्यामधील इसम हा गाडीची नंबर प्लेट बदलत असुन त्याने सुमारे दीड ते दोन महीन्यापुर्वी त्याचेकडील स्विफ्ट गाडीमध्ये काही साथीदारासह दत्तनगर भागात रात्रीच्या वेळी चोरी केलेली आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याचे पोलीस उप-निरीक्षक महेंद्र पाटील यांना कळविली असता त्यांनी ताबडतोब सदरची माहीती श्री विष्णु पवार साो वरिष्ठ पोलीस निरीक्षक साो व विष्णु ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे) भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांना कळविली असता त्यांनी तपास पथकातील कर्मचारी यांचेसह ताबडतोब कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सदर आदेशाप्रमाणे तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक श्री महेंद्र पाटील यांनी तपास पथकाचे कर्मचारी यांचेसह मुंबई बॅगलोर हायवेचे भुमकर चौकाकडुन आंबेगाव बु।। कडे जाणारे सर्व्हिस रोडवर जावुन वॉच केला असता सर्व्हिस रोडवरील हॉटेल व्हिलेजच्या अलीकडे काही अंतरावर बातमीतील इसम राजस्थान आरटीओ पासींग असलेली स्विफट कारची नंबर प्लेट बदलत असल्याचे दिसल्याने त्यास स्विफट कारसह ताब्यात घेवुन त्यास त्याचा नाव पत्ता विचारता त्याने त्याचा नाव **जितेंद्रकुमार चंम्पालाल जैन वय.३४ वर्ष रा. घर नं १०५, ओडवाडीया मोहल्ला बुसी गाव ता.रानी जि.पाली राजस्थान** असे असल्याचे सांगितलेनंतर पोलीस ठाणे येथे आणुन त्याचेकडे कसुन चौकशी केली असता त्याने व त्याचे इतर साथीदार १) राजेंद्रसिंग राजपुरोहीत रा.सिरोई राजस्थान, २) धोलाराम ऊर्फ दिलीप चौधरी रा.बुसीगाव ता.रानी जि.पाली राजस्थान, ३) तेजाराम रा.मारवाड असे चौघांनी मिळुन स्विफट डिझाईर कारमधुन येवुन दत्तनगर भागात दोन महिन्यापुर्वी रात्रीच्या वेळी एका बंद बंगल्यामध्ये चोरी केलेबाबत सांगीतलेनंतर त्याचेकडे अधिक चौकशी करता त्याने व त्याचे साथीदार यांनी सुमारे १५ दिवसापुर्वी जुन्नर परिसरातुन एक सेन्ट्रो कार चोरी केलेनंतर चोरीची सेन्ट्रो कारमधुन न-हे परिसरात रात्रीच्या वेळी एका कपडयाचे दुकानाचे शटरचे कुलुप तोडुन दुकानातील पुरुषांचे ब्रॅडेड कपडे चोरी केले असल्याबाबत तपासात निष्पन्न झाले असुन त्याचेकडुन **चोरी केलेले कपडयापैकी १,१२,०००/- ब्रॅडेड कपडे, १,५०,०००/- रु सेन्ट्रो कार,४,००,०००/-ची स्विफट डिझाईर कार असा एकुण कि.रु ६,६२,०००/-चा माल जप्त** करुन भारती विदयापीठ पोलीस ठाणे कडील १ तसेच सिंहगड रोड पोलीस ठाणे कडील १ घरफोडीचा, मंचर पोलीस ठाणे कडील १ वाहनचोरीचा गुन्हा असे एकुण ३ गुन्हे उघडकीस आणले आहेत. वरील आरोपी इसमाचे इतर तीन साथीदार फरार आहेत. अधिक तपास पोलीस उप-निरीक्षक श्री महेंद्र पाटील हे करीत आहे.

सदरची कारवाई मा.श्री श्रीकांत तरवडे साो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री बच्चन सिंह साो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.प्रीती टिपरे मॅडम सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, विष्णू पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.महेंद्र पाटील, पोलीस कर्मचारी श्रीधर पाटील, गणेश सुतार, उज्वल मोकाशी, प्रणव संकपाळ, समीर बागसिराज, जगदीश खेडकर, शिवदत्त गायकवाड,सर्फराज देशमुख, अमोल तांबे यांचे पथकाने केलेली आहे.